
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | मंगळवार, 26 मे 2026 | अंक क्र. 23 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com








# ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मुंबईत ‘वृक्षारोपण मोहिम’ ; अभिनेत्री शिल्पा शेट्टीही उपस्थित

## हरित व प्रदूषणमुक्त मुंबईसाठी वृक्षारोपण मोहिमा महत्वाच्या

■ मुंबई वृत्तसंस्था


डी. वाय. पाटील इंटरनॅशनल स्कूल, वरळी आणि भामला फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आज ‘वृक्षारोपण मोहिमेचे’ आयोजन करण्यात आले. या उपक्रमात राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सहभागी होत विद्यार्थ्यांसोबत वृक्षारोपण केले.

या मोहिमेप्रसंगी जलसंपदा मंत्री जयकुमार रावल, मुंबईच्या महापौर रितू तावडे, प्रसिद्ध सिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी, भामला फाउंडेशनचे अध्यक्ष असिफ भामला, सेहर भामला, शाळेचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व मोठ्या संख्येने पर्यावरणप्रेमी उपस्थित होते.

यावेळी पंकजाताई मुंडे व मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या आवारात आणि लगतच्या परिसरात वड, पिंपळ, कडुनिंब, करंज, बहावा अशा देशी प्रजातींच्या विविध रोपे लावण्यात आली. भामला फाउंडेशनतर्फे पुढील तीन वर्षे या झाडांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्यात आली आहे.

### शहर हिरवेगार ठेवण्यासाठी मोहिमा महत्त्वाच्या

**■ वृक्षारोपणानंतर बोलताना मंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या, “वाढत्या शहरीकरणात आपल्या शहराला हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी अशा मोहिमा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. एक झाड म्हणजे हजारो लोकांना ऑक्सिजन. डी. वाय. पाटील स्कूल आणि भामला फाउंडेशनने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या. याप्रसंगी विद्यार्थ्यांना आवाहन करताना त्या म्हणाल्या,"फक्त झाड लावून थांबू नका, तर त्याचे संगोपनही करा. प्रत्येक विद्यार्थ्याने एक झाड दत्तक घेऊन मोठे करावे. चला, आपण सर्वांनी मिळून अधिकाधिक झाडे लावूया आणि त्यांचे संगोपन करून येणाऱ्या पिढीला सुरक्षित भविष्य देऊया,” असे आवाहन मुंडे यांनी यावेळी केले.**



# इंधनदरवाढीवरून रोहित पवारांचा सरकारवर घणाघात

## “निवडणुका पुढे ढकला, जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष द्या”

■ मुंबई : वृत्तसंस्था

**राज्यात पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त असताना सत्ताधारी आणि विरोधक विधान परिषद निवडणुकीच्या राजकारणात व्यस्त असल्याचा आरोप करत आमदार Rohit Pawar यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. विधान परिषदेच्या 17 जागांसाठी जाहीर झालेल्या निवडणुका तातडीने पुढे ढकलून सरकारने जनतेच्या ज्वलंत प्रश्नांकडे लक्ष द्यावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.**


**आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती आणि मध्यपूर्वेतील संघर्षामुळे गेल्या काही दिवसांत इंधनाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. आज (25 मे) मुंबईत पेट्रोलच्या दरात तब्बल 2.61 रुपये, तर डिझेलच्या दरात 2.71 रुपयांची वाढ झाली. मागील दहा दिवसांतील ही चौथी वाढ असून, यामुळे महागाईचा आणखी भडका उडण्याची शक्यता आहे. रोहित पवार यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वरून सरकारला लक्ष्य करत म्हटले की, राज्यात इंधनटंचाईची परिस्थिती गंभीर बनत चालली आहे. पुण्यासारख्या शहरात जमावबंदीचे आदेश लागू करण्याची वेळ आली आहे. अशा बिकट परिस्थितीत निवडणुका घेण्यापेक्षा सरकारने जनतेच्या अडचणी सोडविण्यावर भर द्यायला हवा. तसेच, या निवडणुकांत “घोडेबाजार” होण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी रिसॉर्ट पॉलिटिक्स, पर्यटन आणि मतांच्या सौद्यासाठी शेकडो कोटी रुपयांची उधळपट्टी होईल, असा टोला लगावला. “निवडणूक आयोगाने राज्यातील गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन निवडणुका पुढे ढकलाव्यात. त्यामुळे सरकारलाही जनतेच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळेल,” असे त्यांनी स्पष्ट केले.**



### गेल्या 10 दिवसांतील दरवाढ

- 15 मे : सुमारे 3 रुपयांची वाढ
- 19 मे : सुमारे 90 पैशांची वाढ
- 23 मे : पुन्हा 90 पैशांची वाढ
- 25 मे : पेट्रोल 2.61 रु., डिझेल 2.71 रु. वाढ

**■ एकूणच, गेल्या दहा दिवसांत पेट्रोल 7.35 रुपये तर डिझेल 7.53 रुपये प्रति लिटरने महागले आहे. या वाढीचा थेट परिणाम भाजीपाला, दूध, फळे आणि अन्य जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होणार असल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला मोठा फटका बसणार आहे.**




# खेड्यांमध्ये बदल घडवणारी धक्कादायक वस्तुस्थिती

## ग्रामीण भागातील शाळा बंद पडण्याचे संकट ; नीती आयोगाच्या अहवालातून ग्रामीण शिक्षण व्यवस्थेचे वास्तव समोर

■ पुणे : वृत्तसंस्था

देशातील ग्रामीण भागातील शिक्षण व्यवस्थेसमोर गंभीर आव्हान उभे ठाकले आहे. गेल्या दहा वर्षांत देशभरातील लाखो शाळा बंद पडल्याची धक्कादायक बाब नीती आयोगाच्या अहवालातून समोर आली आहे. विशेषतः खेड्यांमधील सरकारी आणि अनुदानित शाळांवर याचा मोठा परिणाम झाला असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत.

नीती आयोगाने प्रसिद्ध केलेल्या ‘स्कूल एज्युकेशन सिस्टम इन इंडिया : टेम्पोरल ॲनालिसिस अँड पॉलिसी रोडमॅप फॉर क्वालिटी एनहांसमेंट’ या अहवालात २०१४-१५ ते २०२४-२५ या कालावधीतील शिक्षण व्यवस्थेचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.




अहवालानुसार, या दशकात देशभरातील सुमारे १ लाख शाळा बंद झाल्या आहेत. त्यामध्ये १४ हजार सरकारी आणि ४ हजार अनुदानित शाळांचा समावेश आहे. दुसरीकडे, ५१ हजार खासगी शाळांची वाढ झाली असली तरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शाळाप्रवेशाचे प्रमाण घटले आहे. खेड्यांमध्ये विद्यार्थीसंख्या घटणे, स्थलांतर, अपुरी पायाभूत सुविधा, शिक्षकांची कमतरता आणि पालकांचा खासगी शिक्षणाकडे वाढता कल ही यामागील प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अहवालात शाळांची संख्या, विद्यार्थी प्रवेश, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर, शाळेतील सुविधा, विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता आणि शाळा टिकवून ठेवण्याचे प्रमाण अशा विविध बाबींचा अभ्यास करण्यात आला आहे. तज्ज्ञांच्या मते, ग्रामीण शिक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी शासनाने तातडीने ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. अन्यथा खेड्यांतील मुलांच्या शिक्षणाचा पाया अधिकच कमकुवत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# शेतकरी कर्जमाफीला आचारसंहितेत सूट; केंद्रीय निवडणूक आयोगाची मंजुरी

## ३० जूनआधी योजनेची अंमलबजावणी होणार

■ मुंबई : वृत्तसंस्था

विधानपरिषद निवडणुकीमुळे आचारसंहितेच्या कचाट्यात अडकलेल्या शेतकरी कर्जमाफी योजनेला अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने ग्रीन सिग्नल दिला आहे. निवडणूक आयोगाने या योजनेच्या अंमलबजावणीला आचारसंहितेतून विशेष सूट दिली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली ही महत्त्वाकांक्षी कर्जमाफी आता ३० जूनपूर्वीच पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. ऐन पेरणीच्या तोंडावर मिळालेल्या या मंजुरीमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी सध्या निवडणूक प्रक्रिया सुरू असून १८ जून रोजी मतदान होणार आहे. राज्यात आचारसंहिता लागू असल्याने या काळात कर्जमाफीचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करता येतील का, बाबत संभ्रम निर्माण झाला होता. मात्र, निवडणूक आयोगाच्या मंजुरीनंतर आता या योजनेच्या अंमलबजावणीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. सरकारच्या या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आर्थिक अडचणीत सापडलेल्या आणि बँकेचे कर्ज थकलेल्या शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची संपूर्ण कर्जमाफी दिली जाणार आहे. तर दुसरीकडे, बँकेचे कर्ज प्रामाणिकपणे आणि नियमितपणे फेडणाऱ्या शेतकऱ्यांचाही सरकारने सन्मान केला आहे. अशा नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे.

# केंद्र शासनाचा पद्मश्री बहुमान दि. 24 मे 2026 रोजी मिळाल्याबद्दल राष्ट्रसंतांचे वारसा चालविणारे वारकरी जनार्दनपंत बोथे

**या वर्षी गणराज्य दिनानिमित्त पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला तो आपल्या मोझरी येथील अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस व राष्ट्रसंतांचे स्वीय सहाय्यक व फोटोग्राफर राहिलेले श्री जनार्दन पंत बोथे यांना. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर काल दिनांक 24 मे रोजी हा पुरस्कार महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे प्रदान करण्यात आला.**

एक मुलगा लहानपणापासून राष्ट्रसंतांबरोबर राहतो. पुढे तो राष्ट्रसंतांचा फोटोग्राफर होतो. फोटोग्राफी बरोबर राष्ट्रसंतांच्या स्वीय सहाय्यकाचे काम करतो. राष्ट्रसंतानंतर अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचा सरचिटणीस होतो. आपल्या कर्तव्य तत्परतेने गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंतांचा वारसा प्रामाणिकपणे चालवितो. त्या माणसाचे नाव आहे श्री जनार्दनपंत बोथे. राष्ट्रसंतांचा वारसा चालविणारे जे काही मोजके लोक आज जिवंत आहेत त्यामध्ये बोथे दादांचा वाटा मोठा आहे. त्याला कारणही तसे आहे कारण की ते सदा सर्वदा राष्ट्रसंतांबरोबर राहिल्यामुळे राष्ट्रसंतांनी पेरलेले अंकुर त्यांच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये वृद्धिंगत झाले आहेत आणि त्यामुळे त्यांचे प्रत्येक कृती ही राष्ट्रसंतांच्या प्रतिबिंबासारखी आहे.

आज राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज व अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी यांच्या संपूर्ण भारतामध्ये 25000 च्यावर शाखा आहेत. महाराष्ट्रात तर आहेतच. पण महाराष्ट्र बाहेरही अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे विखुरलेले आहे. त्याचे प्रत्यंतर आपल्याला अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाच्या पुण्यतिथी महोत्सवामध्ये येते. संपूर्ण भारतातून मौन श्रद्धांजलीसाठी लाखोंच्या संख्येने लोक भक्त येतात. चार पाच तास त्या रोडवरची वाहतूक दुसऱ्या रोडने वळविण्यात येते. आता तर नवीन बायपासच तयार झालेला आहे. इतकी प्रचंड गर्दी राष्ट्रसंताच्या पुण्यतिथी महोत्सवाला असते.

श्री जनार्दनपंत बोथे यांचे नाव आता सर्वतोपरी झालेले आहे. अतिशय विनम्र स्वभाव .खादीचे वस्त्र. डोक्यावर भगवी टोपी आणि भारतीय बैठक हे चित्र तुम्हाला पहावयास मिळेल .आज वयाची 86 वर्ष पूर्ण केली आहेत .तरीही त्यांचा उत्साह तरुणांसारखा आहे. सकाळी लवकर उठणे. ध्यान प्रार्थना करणे आणि साडेबारापर्यंत कार्यालयात बसणे. आलेल्या कामाचा निपटारा करणे. परत अडीच वाजता कार्यालयीन कामासाठी उपस्थित राहणे. जागोजागी विखुरलेल्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या शाखांना भेटी देणे. तिथल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे .हे त्यांचे कार्य गेल्या 75 वर्षांपासून सुरू आहे. पावसाळा उन्हाळा हिवाळा जरी असला तरी या कामांमध्ये खंड पडलेला नाही. आणि पडणारही नाही.

आज अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाच्या सानिध्यात अनेक मंत्री अनेक आयएएस आयपीएस अधिकारी अनेक आमदार अनेक खासदार अनेक नगरसेवक अनेक लोकप्रतिनिधी आहेत. त्यातील काही तर गुरुदेव सेवा मंडळातूनच घडलेले




आहेत. जो माणूस जो विद्यार्थी गुरुकुंज मोझरी येथे शिक्षण घेतो किंवा मानव सेवा वस्तीगृहात राहतो .त्याला वेगळ्या चारित्र्य प्रमाणपत्राची गरज नाही. इतकी शिस्त श्री जनार्दन पंत बोथे गुरुजी यांनी गुरुकुंजला लावली आहे. तुम्ही त्यांच्या सहवासात आले तर तुम्हाला एक गोष्ट कळेल की ते एक शब्दही बोलत नाहीत. पण सगळी काम आपोआप होतात. ते डोळ्याने बोलतात हाताने बोलतात आणि लोक त्यांचे अनुकरण करतात. तुम्ही जर गुरुकुंज मोझरी येथे गेले तर तुम्हाला असे दिसेल की मुले काम करीत आहेत. मुले प्रार्थना करीत आहेत. मुलं लोकांना सूचना करत आहेत .परंतु कोणीही बोलत नाही. सगळे काम इशारावर चालते आणि ही अभूतपूर्व देणगी श्री बोथे दादांनी तिथल्या कार्यकर्त्यांना तिथल्या लोकांना दिलेली आहे .

आमची बरीचशी शिबिरे आमचे बरेचसे साहित्य संमेलन आमचे बरेचसे कार्यक्रम हे अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ मोझरीच्या स्मृती मंदिरात होतात. या कार्यक्रमासाठी दादांनी आम्हाला गुरुकुंज मोझरीच्या अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या सगळ्या सुविधा उपलब्ध करून दिलेले आहेत. त्यांनी त्यांची दारे आमच्या उपक्रमासाठी सदैव उघडी करून दिलेली आहेत. त्यांचे म्हणणे आहे या निमित्ताने साहित्यिक आयएएस अधिकारी आमच्याकडे येतील. राष्ट्रसंतांचा विचार त्यांच्या गावात जातील घेऊन जातील. त्यामुळे तुम्हाला जेवढे कार्यक्रम घ्यायचे आहेत. तेवढे आमच्या आश्रमातच घ्या. असा त्यांचा आग्रह असतो आणि आम्ही त्यांच्या त्या सूचनांचे पालन करतो. दादांना प्रसिद्धीचा हव्यास नाही. स्टेजवर बसण्याची प्रवृत्ती नाही. ते इतरांना पुढे करतात. स्वतः मागे राहतात .एवढा मोठा पुण्यतिथी महोत्सव किंवा राष्ट्रपती मुख्यमंत्री येवोत दादा सरचिटणीस असले तरी पुढे पुढे करणार नाहीत. ज्यांच्यावर जी जबाबदारी दिलेली आहे ती जबाबदारी तो पार पडेल असा त्यांनी पायंडा घालून दिलेला आहे. म्हणून ते प्रसंगी पुष्पाताईंना म्हणतील .कधी प्रकाश महाराज वाघ यांना म्हणतील. कधी मला पण म्हणतील की काठोळे ही जबाबदारी तुम्ही सांभाळा आणि आम्ही ती जबाबदारी त्यांचे पाईक म्हणून स्वीकारतो आणि पार पाडतो .

आज अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचा विस्तार खूप मोठा झालेला आहे. आयुर्वेद महाविद्यालय आहे .आयटीआय आहे .शाळा आहे. वस्तीगृह आहे. ज्ञानमंदिर आहे .मासिक आहे. प्रिंटिंग प्रेस आहे .वृद्धाश्रम आहे. सर्व काही आहे .पण हे सर्व सुरळीत सुरू आहे याचे सगळे श्रेय श्री बोथे दादा व त्यांचे एकनिष्ठ सहकारी यांनाच आहे. त्यामुळे हा डोलारा व्यवस्थितपणे राष्ट्रसंतांनी आखून दिलेल्या मार्गावरून जात आहे. अनेक वेळा मोठी माणसे निघून गेली की त्यांची अनुकरण करणारे आपापले मार्ग शोधतात. पण बोथे दादा त्याला अपवाद आहेत .राष्ट्रसंतांनी दाखविलेल्या मार्गावरून ते मार्गक्रमण करीत आहेत आणि म्हणूनच या 86 व्या वर्षी देखील त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. त्यांनी जेव्हा वयाची 75 ही पूर्ण केली. त्या कार्यक्रमाला मी प्रमुख पाहुणा म्हणून उपस्थित होतो. अगदी साधा समारंभ झाला. कुठलाही बडे जावपणा नाही .खरं म्हणजे आजकाल आपले वाढदिवस आपले सत्कार मोठ्या प्रमाणात मोठ्या मंगल कार्यालयात साजरी करण्याचचा एक नवीन पायंडा पडत आहे. पण दादा त्याला अपवाद आहेत.

मी त्यांना खूप आग्रह केला की तुम्ही राष्ट्रसंतांच्या सहवासात इतके दिवस राहिलेत तर तुम्ही तुमचे अनुभव लिहून काढा .वाटल्यास मी तुम्हाला लेखनिक देतो .पण दादा विनम्रपणे म्हणाले. राष्ट्रसंत हे सर्व श्रेष्ठ आहेत. त्यांचे विचार म्हणजेच माझे माझे विचार आहेत .मी वेगळे काय सांगणार. स्वतःचे आत्मचरित्र देखील लिहायला हा माणूस तयार नाही. यात त्यांचे मोठेपण आहे .नाहीतर आज उठल्या पडल्या लोक आत्मचरित्र लिहायला लागलेले आहेत. आणि स्वतःचाच गौरव स्वतःच करून घ्यायला लागलेले आहेत. दादा त्याला अपवाद आहेत. त्यांच्या ह्या कामाची दखल केंद्र शासनाने घेतली व त्यांना दिनांक 24 मे 2026 रोजी पद्मश्री पुरस्कार महामहीम राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करून त्यांच्या कार्याला न्याय दिला. त्यानिमित्त त्यांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

**■ प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे , संचालक मिशन आयएएस अमरावती कॅम्प 9890967003**



## इंधन दरवाढीविरोधात काँग्रेसची रणधुमाळी; महागाईविरोधात रस्त्यावर उतरुन तीव्र आंदोलनाचा इशारा

### सातार्‍यात तालुकास्तरावर आंदोलनाची तयारी, जनतेच्या प्रश्नांसाठी काँग्रेस आक्रमक

**■ सातारा : वृत्तसंस्था**

वाढत्या इंधन दरवाढीमुळे आणि महागाईच्या झळांनी सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असताना, या प्रश्नांवर आता काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून लढा उभारणार आहे. इंधन दरवाढ, गॅस सिलिंडरचे वाढते दर आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींतील वाढ याविरोधात सातारा जिल्ह्यात काँग्रेसकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी दिली.

शुक्रवारी सातार्‍यात पत्रकार परिषदेत बोलताना शिंदे म्हणाले की, केंद्र सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे सामान्य जनतेचे जगणे कठीण झाले आहे. पेट्रोल-डिझेलचे वाढते दर, महागलेला गॅस सिलिंडर आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींनी सामान्य कुटुंबांचे अर्थकारण कोलमडले आहे.

याच पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून जिल्हाभर जनजागृती मोहीम राबवली जाणार असून, बुधवारी प्रत्येक तालुकास्तरावर आंदोलन करून सरकारच्या धोरणांचा निषेध केला जाणार आहे. या आंदोलनात काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिंदे यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, “महागाई नियंत्रणात आणण्यात केंद्र सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ आश्वासनांची खैरात केली जात आहे. आता जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरली आहे.” या आंदोलनामुळे सातारा जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापण्याची चिन्हे असून, महागाईच्या मुद्द्यावर काँग्रेस सरकारला घेरण्याच्या तयारीत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## लोकांना सेवा देण्यात महसूल विभाग राज्यात सर्वोत्कृष्ट

**मुंबई :** राज्यातील जनतेला देण्यात येणाऱ्या प्रशासकीय सेवा अधिक सुलभ, गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी राबविण्यात आलेल्या 'गव्हर्नन्स प्रोसेसिंग री-इंजिनिअरिंग' फेज-२ च्या आढावा बैठकीत महसूल विभागाने राज्यात अव्वल दर्जा पटकावला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध विभागांच्या कामगिरीचा आढावा घेण्यात आला, ज्यामध्ये महसूल विभागाच्या सर्वोत्तम कामगिरीबद्दल मुख्यमंत्र्यांनी विभागाचे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष कौतुक व अभिनंदन केले.

### सेवांचे सुलभीकरण व वेळेची बचत

**■ महसूल विभागामार्फत सध्या 'सेवा हक्क कायद्यांतर्गत' एकूण ५४ सेवा पुरविल्या जातात. यामध्ये महसूल विभागाच्या २० सेवा, नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाच्या २० सेवा आणि जमाबंदी आयुक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या १४ सेवांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाने या सर्व सेवांचे म्हणजेच प्रशासकीय सुलभीकरण करण्याचा निर्णय घेतला होता. या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात (फेज-१) अर्जांचे नमुने अत्यंत सुटसुटीत करण्यात आले असून, अनावश्यक कागदपत्रांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर, फाईल मंजुरीसाठी लागणारे प्रशासकीय टेबल (कार्यासन मंजुरीचे स्तर) कमी केल्यामुळे सामान्य नागरिकांना अत्यंत कमी वेळेत आणि जलदगतीने दाखले व प्रमाणपत्रे मिळणे सुरू झाले आहे. अल्पभूधारक, अधिकार अभिलेखाची प्रमाणित प्रत, प्रतिज्ञापत्र साक्षांकीत करणे, उत्पन्न प्रमाणपत्र, भूमीहीन शेतमजूर असल्याचा दाखला, नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (शपथपत्रासह), नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र (शपथपत्राविना), ज्येष्ठ नागरीक प्रमाणपत्र, तात्पुरता रहिवास प्रमाणपत्र, वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र या सेवांचा समावेश आहे.**




दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# भारतीय जनगणना 2027 : परळी वैजनाथ घरगणनेत सर्कल क्र. 34 अव्वल; प्रगणक टीमचा सत्कार

■ **परळी वैजनाथ (प्रतिनिधी)**

भारतीय जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम नगरपरिषद परळी वैजनाथ येथे सुरू असून सर्कल क्र. 34 मधील पर्यवेक्षक व प्रगणकांच्या टीमने उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण काम सर्वप्रथम पूर्ण केले आहे. या उत्कृष्ट कार्याबद्दल संबंधित टीमचा कार्यालयात सत्कार समारंभ आयोजित करून गौरव करण्यात आला. दि.16 मे ते 14 जून दरम्यान प्रगणकांना सहकार्य करावे तसेच राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जनगणनेत सहभागी व्हा असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे.

भारतीय जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम नगरपरिषद परळी वैजनाथ येथे सुरू असून या टीममध्ये पर्यवेक्षक सरताज ताहेरखान तसेच प्रगणक 0199 फड संतोष, 0200 हैद्राबादे नितीन, 0201 नागरगोजे प्रवीण, 0202 शेख मसूद, 0203 पठाण फरहत बेगम व 0204 शेख मुस्ताक शेख पाशा यांचा समावेश होता. भारतीय जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणनेचे काम यशस्वीरित्या व वेळेत पूर्ण केल्याबद्दल त्यांचा पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला.

यावेळी चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री. पोपट नानासाहेब निगळ, उपमुख्याधिकारी संतोष रोडे, जिल्हा जनगणना क्षेत्र प्रशिक्षक प्रा. शंकर कापसे, प्रा. अतुल दुबे, श्री. पंकज मधूकरराव दहातोंडे व श्री. वसीम अकबर शेख यांच्या उपस्थितीत टीमचे अभिनंदन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी टीमच्या कार्याचे कौतुक करत पुढील जनगणना प्रक्रियाही याच तत्परतेने व जबाबदारीने पूर्ण करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

परळी वैजनाथ शहरात जनगणना प्रक्रिया जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून प्रशासकीय तयारी पूर्ण करण्यात आली आहे. यासाठी विविध स्तरांवर प्रशिक्षण देण्यात आले असून 1 चार्ज अधिकारी, 1 अतिरिक्त चार्ज अधिकारी, 1 विभाग प्रमुख, 1 सहायक विभाग प्रमुख, 2 फिल्ड ट्रेनर, 35 पर्यवेक्षक व 208 प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली आहे. दि. 1 मे 2026 ते 15 मे 2026 या कालावधीत स्व-गणना करू न शकलेल्या नागरिकांसाठी 16 मे 2026 ते 14 जून 2026 दरम्यान नियुक्त प्रगणक घरभेटी देऊन माहिती संकलित करत आहेत. जनगणनेदरम्यान शासनाने निर्धारित केलेल्या 33 प्रश्नांची अचूक माहिती नागरिकांनी प्रगणकांना देणे आवश्यक राहणार आहे. संबंधित माहिती डिजिटल पद्धतीने जनगणनेच्या पोर्टलवर नोंदविण्यात येणार असून माहितीची पडताळणी देखील करण्यात येणार आहे. स्व-गणना पूर्ण केलेल्या नागरिकांनी प्राप्त झालेला SE ID प्रगणकांना देणे आवश्यक राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नागरिकांची सर्व माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित ठेवली जाणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. परळी वैजनाथ शहर घर सूचीकरणाच्या कामात अग्रस्थानी राहावे यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे तसेच नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देत राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे, असे आवाहन चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी श्री. पोपट नानासाहेब निगळ यांनी केले आहे.



# वडिलांचा जीवन गौरव पुरस्कार अपर मुख्य सचिवांनी स्वीकारला




महाराष्ट्र राज्याचे अपर मुख्य सचिव व सुप्रसिद्ध आयएएस अधिकारी श्री विकास खारगे आयएएस यांनी अमरावतीच्या डॉ. पंजाबराव देशमुख अकादमीने त्यांच्या वडिलांना दिलेला जीवन गौरव पुरस्कार एका भव्य समारंभात स्वीकारला. अमरावतीच्या सर्वात भव्य अशा सिकची रिसॉर्ट मध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागतिक कीर्तीचे संशोधक अबुधाबीचे डॉ.चंद्रशेखर मुरादे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री आशिष येरेकर तर नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विपीन इटनकर यांच्या मातोश्री श्रीमती शारदाताई इटनकर रिलायन्स उद्योग समूहाचे राज्य समन्वयक श्री देवेंद्र खडसे जीएसटीचे उपायुक्त श्री महेबूब कासार मिशनचे संचालक प्रा.डॉ. नरेशचंद्र काठोळे व प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री सचिन माळकर हे विचार पिठावर उपलब्ध होते. मागील महिन्यात अमरावतीच्या सुप्रसिद्ध अशा डॉ. पंजाबराव देशमुख अकादमीच्या कार्यकारिणीच्या सभेत श्री विकास खारगे यांच्या वडिलांना म्हणजे श्री शंकरराव खारगे यांना त्यांचे शैक्षणिक व सामाजिक जीवनात केलेले कार्य लक्षात घेऊन त्यांना जीवन गौरव पुरस्कार देण्याचे ठरविले होते .त्याप्रमाणे त्यांना रितसरपत्र देण्यात आले होते .पण त्यांचे वय 96 असल्यामुळे ते कार्यक्रमाला येऊ शकले नाहीत. शिवाय इचलकरंजी ते अमरावती हा मोठा प्रवास असल्यामुळे त्यांनी येण्यास असमर्थता दर्शविली होती. म्हणून श्री शंकरराव खारगे यांच्या वतीने त्यांचा जीवन गौरव पुरस्कार त्यांचे सुपुत्र व सुप्रसिद्ध सनदी अधिकारी अप्पर मुख्य सचिव श्री विकास खारगे यांनी स्वीकारला. श्रीमती शारदाताई इटनकर यांच्या हस्ते हा जीवनगौरव पुरस्कार तसेच सन्मान चिन्ह त्यांना देण्यात आले. या समारंभानिमित्त श्री विकास खारगे यांनी उपस्थित विद्यार्थी



व मान्यवरांना मार्गदर्शन केले. आपल्या कार्यक्रमात त्यांनी आपल्या वडिलांनी केलेल्या संस्काराचा आवर्जून उल्लेख केला.कार्यक्रमाला स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच अमरावती शहरातील नागरिकांची भरगच्च उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रेम किशोर चॅरिटेबल ट्रस्टचे संचालक श्री सचिन माळकर यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ.नरेशचंद्र काठोळे यांनी करून दिला . कार्यक्रमाच्या सुरुवातीला चि. मराठे यांनी महाराष्ट्र गीत सादर केले.कार्यक्रमाची सांगता प्रा. पल्लवी येरुळकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. कार्यक्रमाच्या शेवटी राष्ट्रगीत सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख अकादमी मिशन आयएएस त्रिवेणी फाउंडेशन व प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

# अखिल भारतीय कॉँग्रेस कमिटी ओबीसी विभागाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष पदी महाराष्ट्रातून श्री भानुदास माळी यांची नियुक्ती

■ **मुंबई (प्रतिनिधी)**

ओबीसी नेते श्री भानुदास माळी यांनी यापूर्वी महाराष्ट्र प्रदेश कमिटी ओबीसी विभागाच्या प्रदेश अध्यक्ष पदी ५ वर्षे कार्यरत राहून महाराष्ट्रात वरिष्ठ नेत्यांच्या मदतीने ओबीसी समाजातील लहान घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला व पक्ष संघटन मजबूत करण्यावर भर देऊन प्रदेश अध्यक्ष पद अत्यंत निष्ठेने सांभाळले. भानुदास माळी यांनी गाव पातळी पासून पासून मुंबई ते दिल्ली पर्यंत विविध सामाजिक राजकीय आंदोलनांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. अनेक वेळा ओबीसींच्या प्रश्नावर जन आंदोलने मेळावे व शिबिर ही घेण्यात आली. कार्यकर्त्यांमध्ये ओबीसी व कॉँग्रेस पक्षात



उत्साह कामाच्या माध्यमातून वाढविला. तळागाळातील सामान्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची हातोटी असून, त्यांच्या या अनुभवाचा फायदा आगामी निवडणुकांमध्ये कॉँग्रेस पक्षाला नक्की होईल.

*पक्षाशी संघटन व पक्षाचे विविध कार्यक्रम तसेच जनतेचे व कार्यकर्त्यांची प्रश्न पक्ष व प्रशासनामध्ये व्यवस्थित हाताळल्यामुळे भानुदास माळी यांचे कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेस ओबीसी विभागाच्या वतीने राष्ट्रीय उपाध्यक्ष पदाची निवड केल्यामुळे कॉँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्तीला राष्ट्रीय राजकारणा संधी मिळाली असून त्याचा सार्थ अभिमान महाराष्ट्रातील ओबीसी बांधवांना आहे .ज्या लोकांनी महाराष्ट्र मध्ये ओबीसी कॉँग्रेस संघटन उभे केले त्या लोकांना न्याय मिळाला आहे .नियुक्ती जाहीर झाल्यानंतर त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तसेच खा मुकुल वासनिक, प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, माजी प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज बाबा चव्हाण भानुदास माळी यांना कॉँग्रेसचे नेते व कार्यकर्त्यांनी अभिनंदन करून पक्ष मजबूत करण्यासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# वरळी जेट्टीच्या नियोजित विकासाला गती ; जलवाहतूक आणि हेलिपॅड सुविधांवर भर

## मुंबईतील सागरी वाहतूक अधिक सक्षम आणि आधुनिक करण्या-साठी राज्य सरकार कटिबद्ध

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

वरळी जेट्टीच्या नियोजित विकासासंदर्भात राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली असून, या प्रकल्पामुळे मुंबईतील जलवाहतूक, आपत्कालीन सेवा आणि पर्यटनाला मोठी चालना मिळणार असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिली. मंत्रालयात आयोजित बैठकीत वरळी जेट्टीच्या विकास आराखड्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्यावेळी राणे बोलत होते.यावेळी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुंबई कोस्टल रोड प्रकल्पाच्या बांधकामादरम्यान बांधकाम साहित्य वाहतुकीसाठी अमरसन्स गार्डन इंटरचेंज परिसरात तसेच वरळी डेअरी परिसरात तात्पुरत्या जेट्टी उभारण्यात आल्या होत्या. आता हा प्रकल्प पूर्णत्वाकडे जात असताना या जेट्टींचा उपयोग जलवाहतूक,



आपत्कालीन वैद्यकीय सेवा, वॉटर ॲम्ब्युलन्स आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी करण्याचा विचार आहे, असे मंत्री राणे म्हणाले.

कडून स्ट्रक्चरल ऑडिट केले आहे. अहवालानुसार अमरसन्स जेट्टी प्रवासी वाहतुकीसाठी उपयुक्त नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, वरळी डेअरी परिसरातील जेट्टीमध्ये आवश्यक संरचनात्मक बदल केल्यानंतर ती जलवाहतूक आणि वैद्यकीय आपत्कालीन सेवांसाठी वापरता येऊ शकते, असे निरीक्षण नोंदविण्यात आले. या प्रकल्पासाठी प्री-फिजिबिलिटी रिपोर्ट, डीपीआर, पर्यावरणीय परवानग्या आणि अन्य तांत्रिक मंजुरींसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्ती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, निविदाकाराची निवडही अंतिम टप्प्यात आहे.दरम्यान, वरळी जेट्टीवर हेलिपॅड विकसित करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) तत्वावर इच्छुक संस्थांकडून 'एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट' मागविण्यात आले आहेत; असे मंत्री नितेश राणे म्हणाले.

"मुंबईतील सागरी वाहतूक अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. वरळी जेट्टीचा विकास हा केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून, आपत्कालीन सेवा, पर्यटन आणि किनारी भागातील कनेक्टिव्हिटी वाढविण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा ठरणार आहे" ; असे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे म्हणल्या की,वरळी जेट्टीच्या विकासासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाला आवश्यक ते सर्व सहकार्य महापालिका प्रशासनाकडून देण्यात येईल.

# काळमवाडीत पहिलीच्या वर्गाचे गुणवत्ता शोध परीक्षेत उल्लेखनीय यश !

# सांगली जिल्हा परिषदेच्या गुणवत्ता शोध परीक्षेत अमृता आणि हर्षिताने मारली बाजी !



**काळमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना मुख्याध्यापक सुरेश यटम, दीपक रोकडे, संपतराव पाटील, सुनील हवालदार, राहुल मोरे, सुहास पाटील, सचिन बामणे, संगीता सुपने, मनीषा काटवटे**

### इयत्ता पहिलीचा वर्ग : अप्रगत विद्यार्थी विरहित !

**■ काळमवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता पहिलीच्या वर्गाचे कामकाज सुरू आहे. १००% प्रगत वर्ग हे या वर्गाचे वैशिष्ट्य असून अप्रगत विद्यार्थी विरहित वर्ग ही संकल्पना त्यांनी प्रत्यक्षात साकार केली आहे. जिल्हा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या गुणवत्ता परीक्षेतील यशाबरोबरच इतर स्पर्धा परीक्षेमध्येही या वर्गाचे यश उल्लेखनीय आहे.**

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीने मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पहिलीच्या गुणवत्ता शोध परीक्षेत अमृता प्रमोद साळुंखे आणि हर्षिता अमोल वारे या दोन विद्यार्थिनींनी ८६ गुण मिळवत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक प्राप्त करत उल्लेखनीय यशाचा झेंडा जिल्हास्तरावर फडकवला आहे.

वाळवा तालुक्यातील सर्वात जास्त पट असणारी काळमवाडी येथील जिल्हा परिषदेची शाळा ! २५१ पट असणारी वाळवा आणि शिराळा तालुक्यातील ही सर्वात मोठी शाळा ! या शाळेतील इयत्ता पहिलीच्या वर्गातील अमृता प्रमोद साळुंखे आणि हर्षिता अमोल वारे या विद्यार्थ्यांनींनी ८६ गुण मिळवत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत आठवा क्रमांक पटकावला आहे !

इयत्ता पहिलीच्या या गुणवत्ता शोध परीक्षेस या वर्गातील ३३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी २० विद्यार्थ्यांना ६०% पेक्षा अधिक गुण प्राप्त झाले आहेत. वर्गाचा निकाल ६१% लागला आहे.

याचबरोबर समृद्धी प्रज्ञा शोध परीक्षेत ईश्वरी संतोष बंडगर या विद्यार्थिनीने ९२ गुण मिळवत जिल्ह्यात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. अमृता प्रमोद साळुंखे आणि हर्षदा अमोल वारे या विद्यार्थिनींनी ९० गुण मिळवत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत तृतीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत या वर्गाचा १००% निकाल लागला आहे.

उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली या वर्गाचा यशाचा आलेख उंचावला आहे.

वाळवा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी डॉ. आबासाहेब पवार, गट शिक्षणाधिकारी सुनील आंबी, शिक्षण विस्तार अधिकारी सौ. छायादेवी माळी, केंद्रप्रमुख राजेंद्र पाटील, वरिष्ठ मुख्याध्यापक सुरेश यटम यांच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनातून या शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी व्यापक प्रयत्न सुरू आहेत. एक उपक्रमशील शाळा म्हणून ही शाळा सातत्याने आघाडीवर आहे. उपक्रमशील शिक्षक दीपक रोकडे गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत आहेत.सांगली जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. संगीता पाटील, जिल्हा परिषदेच्या सदस्या श्रीमती संध्याताई पाटील, पंचायत समिती सदस्या सौ.सुप्रिया पाटील, प्रकाश पाटील सरपंच सविता सावंत, उपसरपंच स्वप्निल सूर्यवंशी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अजित सावंत, उपाध्यक्ष सिताराम सावंत यांनी या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

गुणवत्ता शोध परीक्षेत
अमृता साळुंखे, हर्षिता वारे,
स्वानंद सावंत, माहेश्वरी सावंत,
ईश्वरी बंडगर, परी सावंत, राजवीर सावंत, अद्वैत यमगर, अविष्कार सावंत, रुद्र सूर्यवंशी, श्रीशा सावंत, कार्तिकी माने, काव्या देसाई, प्रणव केसरे, विक्रांत खेतमर, काव्या शिंदे, वेदांत लगड, स्वरा सूर्यवंशी, शुभश्री देसाई, राजनंदिनी सावंत या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले आहे.


■ **दीपक रोकडे भाटवडे/ सांगली याजकडून ९७६७६५२२२४**

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, मंगळवार 26 मे 2026




# सिरसाळ्यात पूज्य भन्ते व भिक्खू संघाच्या उपस्थितीत धम्मक्रांतीचा उत्साह धनंजय मुंडे यांच्या हस्ते भव्य बुद्ध विहाराचे लोकार्पण

■ परळी (प्रतिनिधी)



परळी तालुक्यातील सिरसाळा येथे रविवार, २४ मे २०२६ रोजी एक ऐतिहासिक सुवर्णक्षण साजरा झाला. चक्रवर्ती सम्राट अशोक बुद्ध विहारामध्ये तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या बुद्धरूपाचे अनावरण आणि विहाराच्या देखण्या इमारतीचा लोकार्पण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पूज्य भंते आणि भिख्खू संघाच्या उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण परिसर धम्ममय झाला होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भंते डॉ. धम्मदीप महाथेरो (अध्यक्ष, भीम जन्मभूमी, महू) आणि भंते प्रज्ञापिओ (बोधगया) यांच्या हस्ते निळ्या ध्वजाचे व पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सिरसाळा गावातील प्रमुख मार्गांवरून भगवान बुद्धांच्या मूर्तीची भव्य मिरवणूक काढण्यात आली. "बुद्धं शरणं गच्छामि"च्या जयघोषाने वातावरण भारून गेले होते. मिरवणुकीनंतर भंतेजींसह सुमनबाई अश्रुबा किरवले व मनीषा महादेव किरवले यांच्या हस्ते बुद्धरूपाचे अनावरण करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात भिक्खू संघाने गाथा पठण करून मूर्तीचे विधिवत अनावरण केले. यावेळी भिक्खुणी आर्याजी रूपनंदा यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, श्रीलंकेप्रमाणेच येथेही बुद्धपूजेला श्रद्धा आणि शिस्तीचे महत्त्व असावे. सिरसाळा येथील विहार हे केवळ इमारत नसून ते संस्कार केंद्र बनावे, जिथे धम्म स्कूल आणि भिक्खू निवास सुरू व्हावा. भंते डॉ. धम्मदीप महाथेरो यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "गाव तिथे बुद्ध विहार आणि ग्रंथालय" या स्वप्नाचा उल्लेख करत सिरसाळ्यातील कार्याचे कौतुक केले. तर भंते प्रज्ञापिओ यांनी "शील हाच खरा अलंकार आहे" असे सांगत, मानवी कल्याणासाठी धम्माचे आचरण करण्याचे आवाहन केले.

तिसऱ्या सत्रात परळीचे आमदार तथा माजी सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते विहाराच्या आकर्षक इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी स्मार्ट सिटीचे आयुक्त रवींद्र जोगदंड, प्रशांत बलवाड (स्वीय सहाय्यक, राज्यपाल राजस्थान), उमेश सोनवणे (उपआयुक्त), प्रभाकर वंजारे (सेवानिवृत्त डेप्युटी कमिशनर), सिद्धार्थ धनंजकर (तहसीलदार), सुमित बनसोडे (आकाशवाणी) यांसह ॲड. दिलीप उजगरे, बालाजी गायकवाड, समाधान किरवले,तानाजी व्हावळे, भगवान साकसमुद्रे, मिलिंद चोपडे , गणेश गावंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रामदादा किरवले व अच्युत बप्पा किरवले यांचा त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल सपत्नीक सत्कार करण्यात आला. तसेच मुंबईचे उपजिल्हाधिकारी महादेव किरवले यांनी बुद्धमूर्ती दानस्वरूपात देऊन समाजासमोर एक आदर्श ठेवला. कार्यक्रमाची सांगता प्रसिद्ध भीमशाहीर आनंद शिंदे यांच्या पहाडी आवाजातील भीमगीतांनी झाली.

हा भव्य सोहळा यशस्वी करण्यासाठी सम्राट अशोक बौद्ध विहार समिती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व यशोधरा महिला मंडळाच्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले. यात प्रामुख्याने: रामदादा किरवले, प्रमोदभाऊ किरवले, बाळू काका किरवले, अच्युत बप्पा किरवले, सुभाष चोपडे,प्रा. डॉ. विक्रम धनवे, प्रा. दयानंद झिंजुर्डे, प्रा. डॉ. बालाजी साबळे, रंजीत रोडे, संतोष किरवले. मंगलताई किरवले, पंचशीला ताई किरवले, आराहीबाई आरसुळे,विलास किरवले ,पांडुरंग किरवले ग्रामपंचायत सदस्य संतोष किरवले,अमोल काशिनाथ किरवले, प्रकाश उजगरे, प्रकाश चोपडे, आबासाहेब कांबळे, दिगंबर उजगरे, भक्तराज किरवले, विशाल किरवले, सर्जेराव उजगरे, अरिहंत जैन

या सर्व कार्यकर्त्यांच्या व समस्त गावकऱ्यांच्या उल्लेखनीय योगदानामुळे सिरसाळा येथील हा धम्मसोहळा संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरला आहे.

## कासेवाडी येथे २२ व्या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची आज सांगता;

### ह. भ. प. महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांचे होणार काल्याचे किर्तन

■ आष्टी (प्रतिनिधी):



आष्टी तालुक्यातील कासेवाडी येथे गेल्या २२ वर्षांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची आज मोठ्या उत्साहात सांगता होत आहे. दिनांक १९ मे ते २६ मे दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या या सप्ताहा निमित्ताने गेल्या आठ दिवसांपासून कासेवाडी व परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल सुरू होती. या सप्ताहाची सांगता आज दिनांक २६ मे रोजी गहिनीनाथ गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने होत असून, सकाळी ९ ते ११ या वेळेत हा सोहळा संपन्न होईल. कीर्तनानंतर लगेचच भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, कासेवाडी, आंबेवाडी, ब्रह्मगाव यांच्यासह पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कासेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

या आठ दिवसांच्या सप्ताहाच्या कालखंडात दररोज पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, हरिपाठ आणि प्रवचन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहामध्ये रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. ईश्वरी ताई नागरगोजे, ह.भ.प. अजिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. दादा हरी महाराज ठाकरे, ह.भ.प. किशोर महाराज खाडे, ह.भ.प. अशोक महाराज शास्त्री, ह.भ.प. काशिनाथ महाराज आणि ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री यांचे हरिकीर्तन संपन्न झाले. तर ह.भ.प. कल्याण वाल्लेकर, ह.भ.प. गोविंद पवार, ह.भ.प. श्रद्धाताई गिरी, ह.भ.प. परमेश्वर महाराज शास्त्री, ह.भ.प. तुकाराम महाराज भोसले, ह.भ.प. अशोक डोके सर आणि ह.भ.प. मच्छिंद्र महाराज राऊत यांचे अभ्यासपूर्ण प्रवचन संपन्न झाले.

## सिद्धिविनायक मंदिर सुशोभीकरण प्रकल्पामुळे परिसराला मिळणार नवे रूप

■ मुंबई : वृत्तसंस्था

सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) सदानंद शंकर सरवणकर, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, तसेच सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त उपस्थित होते. सुशोभीकरण प्रकल्पामुळे दररोज दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि प्रसन्न वातावरण मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.



## देशातील पहिला 'पाण्याचा सातबारा' महाराष्ट्रात

**मुंबई :** पाण्याचा बेसुमार वापर टाळण्यासह जल व्यवस्थापन करण्यासाठी आता जमिनीच्या सातबाराच्या धर्तीवर 'पाण्याचा सातबारा' देशात प्रथम महाराष्ट्रात विकसित करण्याचे नियोजन सुरू आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल, पाणीपुरवठा व स्वच्छता, ग्रामविकास विभागाच्या सचिवांसोबत सोमवारी मंत्रालयातील बैठकीत याबाबतचा आढावा घेतला.

जलव्यवस्थापन करणाऱ्या “अक्वेरियम” या संस्थेने यासाठी 'वॉटर ऑडिट' आणि 'बॅलन्सशीट'ची संकल्पना मांडली असून, ही अभिनव योजना राज्यात सुरुवातीला प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेवरून ही बैठक आयोजित करण्यात आल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. सध्या सर्वत्र जमिनीच्या नोंदीसाठी 'सातबारा' उतारा अस्तित्वात आहे, मात्र पाण्यासाठी अशी कोणतीही नोंद प्रणाली नाही.

पाण्याला जागतिक स्तरावर जो मान आणि दर्जा मिळायला हवा, तो सध्या मिळत नाही. एकदा पाण्याचे ऑडिट झाले की, त्याचा वापर कसा करायचा याबाबत काळजी घेतली जाते. जोपर्यंत पाण्याचा वापर रेकॉर्ड केला जात नाही, तोपर्यंत त्यावर नियंत्रण राहणार नाही आणि लोकांची पाण्याचा वापर करण्याबाबतची जबाबदारीही निश्चित होणार नाही. याच उद्देशाने 'ब्लू ग्रीन अर्बन डेव्हलपमेंट'च्या धर्तीवर हे पाऊल उचलण्यात येत आहे.